# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
# ग्राहक तक्रार निवारण मंच
# कोल्हापूर परिमंडळ, कोल्हापूर यांचे समोर

ग्राहक तक्रार क्र. १०९–२०१०/ दिनांक :

श्री. अरविंद कॉटसिन इंडिया लि.
प्लॉट नं. १ ते १२, सेक्टर ए,
श्री. लक्ष्मी सहकारी औंद्योगिक वसाहत,
ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर
— अर्जदार

**विरूध्द**

१) कार्यकारी अभियंता (का.) तथा नोडल ऑफीसर,
म.रा.वि.वितरण कं.लि.,संवसु मंडळ कार्यालय,
मंडल कार्यालय, कोल्हापूर

२) कार्यकारी अभियंता
म.रा.वि.वि. कंपनी मर्यादित,
विभागीय कार्यालय, इचलकरंजी, जि. कोल्हापूर

३) सहाय्यक अभियंता,
म.रा.वि.वि. कंपनी मर्यादित,
ग्रामीण उप विभागीय कार्यालय, इचलकरंजी, जि. कोल्हापूर

— विरूध्द पक्षकार

**कोरम** :– १) श्री. बी.जी. पवार, अध्यक्ष,
२) श्री. जी. बी. पानकर, सदस्य–सचिव
३) श्री. जी.सी. लेले, सदस्य

## महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोग
(ग्राहक तक्रार निवारण मंच)
विनियम २००६ मधील ८.२ चे तरतुदीनुसार

## न्याय निर्णय

श्री. बी.जी. पवार, अध्यक्ष, ग्रा.त.नि.मंच, कोल्हापूर खालील प्रमाणे न्याय निर्णय देत आहेत.

श्री. अरविंद कॉटसिन इंडिया लि. श्री. लक्ष्मी सहकारी औंद्योगिक वसाहत, ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर यांनी परिशिष्ट अ मध्ये महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक गाऱ्हाणे निवारण मंच व विद्युत लोकपाल ) विनियम २००६ मधील नियम ६.१० नुसार वितरण कंपनी विरुध्द मंचाकडे तक्रार दि. २९.५.२०१० रोजी दाखल केली. त्याचा तपशील खालील प्रमाणे –

तक्रारदार अर्जदार श्री. शामसुंदर दगडूलाल मर्दा, मॅनेजिंग डायरेक्टर हे वि.प.चे ग्रामीण उप विभाग इचलकरंजी ( इचलकरंजी विभाग, कोल्हापूर सर्कल ) उच्चदाब औंद्योगिक ग्राहक आहेत. त्यांचा ग्राहक क्र. २५०४९९३०४८४२ आहे. तक्रारदाराचे म्हणण्यानुसार त्यांना वि.प.ने दिलेल्या मार्च २०१० चे बिलात रु. १३३५८३.६१ इतकी रक्कम मागील कालावधीच्या वापरा बाबतचा आकार म्हणून लावण्यात आली आहे. त्यांनी चौंकशी केली असता असे सांगण्यात आले की, सदर रक्कम माहे फेब्रुवारी २०१० च्या वाढीव विद्युत शुल्काची आहे.

तक्रारदाराचे म्हणण्यानुसार शासन अधिसूचना क्र. ईएलडी/२००८/प्र.क्र. ८०/ऊर्जा–१ दि. ४.२.२०१० अन्वये विद्युत शुल्काचे दर दि. १.२.२०१० पसून बदलले आहेत. माहे फेब्रुवारी २०१० चे वीज बील २२.१.२०१० ते १९.२.२०१० या कालावधीचे आहे. त्यामुळे माहे जानेवारी २०१० च्या नऊ दिवसांना मागील दराप्रमाणे विद्युत शुल्क लागणे अपेक्षित आहे, तर माहे फेब्रुवारी २०१० च्या १९ दिवसांना दि. १.२.२०१० पासून अंमलात आलेले विद्युत शुल्क लागणे अपेक्षित आहे. वीज बिलाची तपासणी केली असता असे लक्षात येते की, सदर वीज बिलामध्ये पूर्ण कालावधीवर ( २२.१.२०१० ते १९.२.२०१०) सरसकट नवीन दराप्रमाणे विद्युत शुल्क आकारण्यात आलेले आहे. तथापि महावितरणने मागील कालावधीवरही नवीन दर लागू करुन ग्राहकांकडून बेकायदेशीर व अयोग्य रितीने रक्कम वसूल केली आहे. महावितरणची ही कृती शासकीय आदेशाच्या/ अधिसूचनेच्या विपरीत आहे. तसेच या संदर्भात महावितरणने परिपत्रक क्र. ११७ दि. २५.२.२०१० जारी केले आहे, त्यामध्येही सदर विद्युत शुल्क आकारण्याबाबत मार्गदर्शन व सूचना दिलेल्या आहेत, परंतु प्रत्यक्षात महावितरणने स्वत: जारी केलेल्या परिपत्रकाचे उल्लंघन केले आहे. तक्रारदार यांनी वि.प.च्या मुख्य अभियंता, कोल्हापूर यांचेकडे तक्रार दाखल केली आहे व त्याची प्रत मुख्य अभियंता (वाणिज्य) मुंबई यांना देण्यात आलेली आहे, तथापि अद्याप उत्तर नाही. तसेच जादा वसूल केलेली रक्कम परत करण्यात आली नाही. तरी मंचाकडून अपेक्षित मदत – माहे फेब्रुवारी २०१० च्या बिलाप्रमाणे जादा वसूल केलेली रक्कम व्याजासह त्वरित परत करण्याविषयी अधीक्षक अभियंता, कोल्हापूर यांना आदेश देणेत यावेत. तक्रारीसोबत दि. २१.३.२०१० च्या पत्राची व वि.प.चे परिपत्रक क्र. ११७ दि. २५.२.२०१० ची प्रत सोबत जोडली आहे. वि.प.स दि. १८.६.२०१० पर्यंत लेखी अहवाल सादर करण्याची नोटीस दिली होती, तो त्यांनी दि. २९.७.२०१० ला सादर केला. त्यापूर्वी तक्रारदार यांचा दि. १३.७.२०१० चे मंचाला अग्रेषित पत्र/ अर्ज प्राप्त झाला. त्यामध्ये प्रामुख्याने वि.प.ने शासन अधिसूचनेमध्ये बिलींग मंथ ऑफ फेब्रुवारी २०१० या शब्द प्रयोगाचा अयोग्य अन्वयार्थ लावला आहे. वस्तुत: बिलींग मंथ ही संकल्पना महावितरणने त्यांच्या स्वत:च्या सोयी करिता निर्माण केलेली आहे, कारण प्रशासनिक असुविधेमुळे सर्व ग्राहकांचे वीज बील एकाच दिवशी देवू शकत नाही, दिले जावू शकत नाही, याच कारणास्तव बिलींग मंथ ही संकल्पना निर्माण झालेली आहे. याचा विद्युत शुल्क दरवाढीशी संबंध लावणे अभिप्रेत नाही, लावल्यास चुकीचे आहे. महावितरणचे दि. २५.२.२०१० च्या परिपत्रकाप्रमाणे शुल्क आकारणीविषयी केलेले मार्गदर्शन अतिशय स्पष्ट आहे. बिलींग मंथ प्रमाणे दरवाढ करणे हे ग्राहक हिताच्या विरोधी आहे, कारण बिलींग मंथचा कालावधी प्रति ग्राहक वेगळा होवू शकतो व आहे. त्यामुळे सदर आकारणीचे धोरण हे समानतेच्या तत्वाशी विसंगत आहे. एकाच अधिसूचनेच्या आधारे ग्राहकांना वेगवेगळ्या कालावधी करिता आकार लावणे एक समानतेच्या तत्वाच्या विरोधी आहे, अन्यायकारक आहे. मा. वीज नियामक आयोगाच्या आदेशानुसार महावितरणची आज अखेर झालेली दरवाढ ही एका विशिष्ट दिवसापासून करण्यात आलेली आहे, त्यामध्ये कधीही बिलींग मंथ या संकल्पनेचा आधार घेण्यात आलेला नाही.

त्यामुळे बिलींग मंथप्रमाणे कोणतीही दरवाढ केल्यास चुकीचा पायंडा पडण्याची शक्यता आहे व त्यामुळे ग्राहकांच्या समानतेच्या मुलभूत हक्कावर गदा येवून अन्याय होण्याची भिती आहे, ती बिलींग मंथप्रमाणे वीज दरवाढीची मागणी फेटाळण्यात यावी अशी तक्रारदाराने मंचास विनंती केली आहे.

वितरण कंपनीने आपल्या दि. २९.७.२०१० च्या लेखी अहवालात तक्रारदाराचे मार्च २०१० चे वीज बील बिलींग सॉफ्टवेअर नुसार बनविले आहे, त्यानुसारची फेब्रुवारी २०१० चे बिलातून वाढीव वीज शुल्काची रक्कम भरुन घेण्यात आली आहे. शासन अधिसूचना आधारे वीज शुल्कामध्ये फेब्रुवारी २०१० पासून वाढ करण्यात आली आहे. महावितरणच्या मुख्य कार्यालयाचे परिपत्रक क्र. ११७ दि. २५.२.२०१० मधील मार्गदर्शन व सूचना नुसार ग्राहकास वीज बील अदा करणेत आले आहे व सदरचे परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या अधिसूचनेतील सूचने प्रमाणेच अन्वयार्थ काढणेत आला आहे. तक्रारदाराच्या तक्रारीबाबत मुख्य अभियंता (वाणिज्य) मुंबई यांचेशी संबंधित मुद्देविषयी मार्गदर्शन मागविणेत आलेले आहे ते अद्याप प्राप्त झालेले नाही. बिलींग मंथ प्रमाणे वीज शुल्क दरवाढ केलेली आहे व ती बरोबर आहे त्यामुळे ग्राहकाची विशिष्ट दिवसापासूनची दरवाढ करणे बाबतची मागणी फेटाळणेत यावी. हे शुल्क शासनाकडे जमा होत असल्याने त्यांच्या आदेशाप्रमाणे बिलींग सॉफ्टवेअर केलेले आहे. तक्रारदाराने मागणी केल्याप्रमाणे दि. १.१०.२०१० पूर्वीच्या वीज वापरावर जादा वसूल केलेले वीज शुल्क परत करणेविषयी आदेश होवू नयेत असे म्हटले आहे.

सदरच्या तक्रारीची सुनावणी दि. २८.६.२०१० ला घेतली असता तक्रारदार गैरहजर. सहाय्यक अभियंता श्री. अहुजा मंचासमोर दुपारी ३.० वाजता उपस्थित. लेखी अहवाल देण्यास मुदत मागितली. त्यानंतर दि. १८.८.२०१० रोजी सुनावणी घेण्यात आली असतां, तक्रारदाराचे प्रतिनिधी श्री. वाय.आर. वर्मा उपस्थित. वि.प.तर्फे श्री. आडके, नोडल ऑफीसर व श्री. आहुजा, सहाय्यक अभियंता उपस्थित. तक्रारदाराचे प्रतिनिधी श्री. वर्मा यांनी वि.प.चे परिपत्रक क्र. ११७ दि. २५.२.२०१० चा संदर्भ दिला. बिलींग मंथ अशी संकल्पना कुठेही नाही, वीज दरवाढ ही तारखेपासूनच असते, कुठल्याही महिन्यापासून नसते (not from month) त्यामुळे तक्रारदार यांनी भरलेली रक्कम व्याजासह परत मिळावी अशी मागणी केली. वि.प.चे अधिकारी श्री. आडके व आहुजा यांनी महाराष्ट्र शासनाच्या नोटीफिकेशनप्रमाणे बिलींग मंथ नुसारच फेब्रुवारी २०१० चे बील देण्यात आले आहे. वि.प.चे परिपत्रक शासनाच्या सदर नोटीफिकेशनवर आधारित आहे. बिलींग हा टेरिफचा भाग आहे. तक्रारदार यांनी प्रो रेटा बेसीसवर विभागणीची मागणी केली आहे. मुख्य अभियंता (वाणिज्य) यांचेशी संबंधित मुद्देविषयी मार्गदर्शन मागविणेत आलेले आहे. तक्रारदाराची तक्रार फेटाळण्यात यावी, त्यांना दिलेले वीज बील योग्य आहे.

वरील विवेचनावरुन खालील मुद्दा निर्णयासाठी उपस्थित होत आहे.

१) तक्रारदार यांनी मागणी केल्याप्रमाणे फेब्रुवारी २०१० चे वीज बिलामध्ये जादा वसूल केलेली रक्कम व्याजासह परत देण्याचे आदेश वि.प.ला देणे योग्य होईल काय ?

उत्तर : नाही

<u>**कारणमिमांसा**</u>

उभयबाजूंच्या कथनानुसार मार्च २०१० चे वीज बील ग्राहकास दिले, त्यामध्ये मागील बिलाच्या फरकाची रक्कम रु. १,३३,५८३.६१ वसूल केली आहे. तक्रारदार यांनी तक्रारीसोबत फेब्रुवारी २०१० चे बिलाची झेरॉक्स प्रत दाखल केली आहे त्यामध्ये पूर्वीचे २२.१.२०१० पासून ते चालू दि. १९.२.२०१० पर्यंतचे रिडींग होते.

तक्रारदाराचे प्रतिनिधी यांनी मुख्य अभियंता (वाणिज्य) महावितरण, मुंबई यांचे परिपत्रक क्र. ११७ दि. २५.२.२०१० वर जास्त भर दिला आहे / विसंबून राहिले आहेत. त्यामुळे उपरोक्त शासन अधिसूचना नुसार दि. १.२.२०१० पासून राज्यातील अ, ब, क, फ, ग या खाली होणाऱ्या वीज वापरासाठी विद्युत शुल्काचे दर विनिर्दिष्ट केले आहेत, त्यास संदर्भ दि. ४.२.२०१० चे शासन अधिसूचना क्र. ईएलडी/२००८/प्र.क्र. ८०/ ऊर्जा –१ असा आहे. प्रथमदर्शनी तक्रारदार यांचे प्रतिनिधी श्री. वर्मा यांचे म्हणण्यात तथ्य आहे असे वाटते. महावितरणच्या परिपत्रकात दि. १.२.२०१० पासून वीज शुल्काचे सुधारित दर असे नमूद केले आहे, परंतु शासनाच्या नोटीफिकेशनमध्ये दि. ४.२.२०१० चा संदर्भ दिला आहे, त्यामध्ये फेब्रुवारी २०१० चे बिलींग मंथपासून असा उल्लेख आहे. इंग्रजी नोटीफिकेशन दि. ३०.१.२०१० मध्ये –

In supersession of the Government Notification, Industries, Energy and Labour Department, No. ELD-2003/CR-52/NRG-2 dated the 31st March, 2003, the Government of Maharashtra hereby specifies with effect from the billing month of Feb. 2010, the rates mentioned in column (3) of the table appended hereto, to be the rates at which the electricity duty shall be levied and paid in respect of consumption of energy mentioned in column (2) of the said Table.

त्यामुळे मुख्य अभियंता (वाणिज्य) यांचे परिपत्रक क्र. ११७ मध्ये १.२.२०१० असा उल्लेख आला आहे त्याचा तक्रारदार यांना विशेष फायदा घेता येणार नाही. तक्रारदार आपल्या सोयीसाठी नोटीफिकेशन विरुध्द अर्थ काढू इच्छित आहे ते कायदेशीर व संयुक्तिक नाही. त्यामुळे दि. २२.१.२०१० ते ३१.१.२०१० या ९ दिवसांच्या वीज वापरावर दरवाढ करुन मागणी केलेली रक्कम व भरलेली रक्कम परत मागणेचा तक्रारदार यांना हक्क /अधिकार नाही. त्यांचे म्हणण्यानुसार व १३.७.२०१० च्या अर्जात लिहील्याप्रमाणे ' बिलींग मंथ ' ही संकल्पना वीज शुल्क दरवाढीसाठी चुकीची आहे, हे म्हणणे ग्राह्य धरता येणार नाही. परिणामत: तक्रारदार यांनी मागणी केलेली परतावा रक्कम रु. १,३३,५८३.६१ फेटाळणे योग्य होईल. मुद्दा क्र. १ चे उत्तर नकारार्थी देवून तक्रार फेटाळण्यात येत आहे.

सदरची तक्रार मंचाकडे दि. २९.५.२०१० ला दाखल झाली आहे, परंतु ती कार्यकारी अभियंता, अंतर्गत ग्राहक तक्रार निवारण कक्ष, मंडल कार्यालय, कोल्हापूर यांना अग्रेषित केली आहे. त्यानंतर दि. १३.७.२०१० ला मंचाला अग्रेषित केलेला तक्रार स्वरुप अर्ज दाखल केला आहे. दि. २८.६.२०१० रोजी सुनावणीवेळी तक्रारदार गैरहजर. वि.प.ने लेखी अहवाल देण्यास मुदत मागितली. त्यानंतर दि.१८.८.२०१० ला सुनावणी झाली. मंचाचा बराच वेळ उमा चॅरिटेबल, डी.डी.एफ.ची प्रकरणे व चलनाची पूर्वी सुनावणी घेतलेली १३ प्रकरणे यामध्ये गेल्याने तक्रार मुदतीत काढणे शक्य झाले नाही.

## आदेश

१) तक्रार फेटाळणेत येत आहे.

२) या निर्णयाविरूध्द तक्रारदार यांना अपील करावयाचे असलेस त्यांना आदेशाच्या तारखेपासून ६० दिवसांचे आंत मा. विद्युत लोकपाल, केशवा, बांद्रा–कुर्ला कॉम्प्लेक्स, बांद्रा (पूर्व), मुंबई–५१ यांजकडे करता येईल.

दिनांक : ( बी. जी. पवार )
अध्यक्ष

श्री. जी. बी. पानकर, सदस्य सचिव :

श्री. जी. सी. लेले, ग्राहक सदस्य :

एकमताच्या / बहुमताच्या आदेशाची अंमलबजावणी करण्यात यावी.

( बी. जी. पवार )
अध्यक्ष